# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रयत्नातून
# टाटा सेंटरच्या कामगारांना मिळाली पगारवाढ व एरिअस

पनवेल(प्रतिनिधी) खारघर येथील टाटा मेमोरिअल सेंटरकडून स्थानिक कामगारांवर होणाऱ्या अन्यायाविरोधात आमदार प्रशांत ठाकूर यांनी सातत्याने आवाज उठविल्यामुळे या कामगारांना न्याय मिळाला आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी सतत पाठपुरावा केल्यामुळे टाटा सेंटरमधील २३१ कामगारांना जून महिन्यापासूनच्या पगारात २९ टक्के वेतनवाढ मिळाली असून या कामगारांनी शनिवारी आमदार प्रशांत ठाकूर यांची पनवेल पक्ष कार्यालयात सदिच्छा भेट घेवून त्यांचे आभार व्यक्त केले.

यावेळी तळोजा जिल्हा परिषद कॉंग्रेसचे विभागीय अध्यक्ष व युनियनचे जनरल सेक्रेटरी प्रभाकर जोशी, खजिनदार जयदास तेलवणे, अमजद शेख, सहखजिनदार सी.जी.म्हात्रे यांच्यासह इम्रान पटेल, विनोद जोशी, मन्सूर शेख, उत्तम म्हात्रे, चंद्रकांत वास्कर, प्रदिप घरत, शिवाजी जाधव, तोलामल शेख, अस्लम शेख, प्रितम म्हात्रे आदी कामगार उपस्थित होते.

टाटा मेमोरिअल सेंटर ॲड्व्हान्सड् सेंटर फॉर रिसर्च ॲन्ड् एज्युकेशन इन कॅन्सर (ॲक्ट्रेक) या खारघर येथील हॉस्पिटलमध्ये स्थानिक कामगार काम करीत असून त्यांना संस्थेमध्ये कायम करून घ्यावे, त्यांना परळ येथील टाटा मेमोरिअल हॉस्पिटल मधील कायम कामगारांप्रमाणे पगार, भत्ते आणि इतर सोईसुविधा देण्यात याव्यात, अशा मागण्यांसाठी आमदार प्रशांत ठाकूर यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्याचबरोबर व्यवस्थापनाने कोणतीही चालढकल न करता लेखी स्वरूपात करार करावा असेही वारंवार सांगण्यात आले होते. मात्र व्यवस्थापनाने हलगर्जीपणा कायम ठेवला त्यामुळे अखेर कामगारांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली २६ मे २०१४ पासून टाटा हॉस्पिटलविरोधात आंदोलनाचा पवित्रा घेतला व तशी रितसर नोटीसही युनियनच्यावतीने व्यवस्थापनाला देण्यात आली होती. आंदोलनाचा धसका घेवून व्यवस्थापनाने सहाय्यक पोलीस आयुक्त सुर्यवंशी यांच्याशी समन्वय साधून व्यवस्थापन व युनियनमध्ये मध्यस्थी करून त्यावेळी बैठकीचे आयोजन केले होते. त्या बैठकीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी कामगारांच्या बाजुने लढा देत कामगारांना पगारवाढ व सोयीसुविधा देण्याची जोरदार मागणी करून ती तडीस नेली. त्यानुसार टाटा मेमोरिअल सेंटर ॲड्व्हान्सड् सेंटर फॉर रिसर्च ॲन्ड् एज्युकेशन इन कॅन्सर (ॲक्ट्रेक) संचालिका डॉ.एस.व्ही.चिपळूणकर यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मागणीचा विचार करून कामगारांना जूनपासून पगारवाढ देण्याचे कबूल केले होते. त्यानुसार कामगारांना २९ टक्के पगारवाढ त्याचबरोबर डिसेंबर २०१२ पासूनचा पगाराच्या तफावातील एरिअसच्या पहिल्या टप्प्यातील रक्कमही देण्यात आली आहे. आमदार प्रशांत ठाकूर यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे कामगारांना न्याय मिळाला असून त्याबद्दल आज कामगारांनी त्यांचे आभार व्यक्त केले.

**आमदार प्रशांत ठाकूर यांच्यामुळे टाटा सेंटरमधील कामगारांना न्याय मिळाला आहे. पगारवाढीसोबत एरिअस कामगारांना मिळाला आहे. एरिअस तीन टप्प्यात देण्यात येणार असून पहिला टप्पा कामगारांना व्यवस्थापनाने दिला आहे.आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पाठपुराव्यातून कामगार टप्प्याटप्प्याने कायम करण्यात येणार आहेत. हा आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाचा व कामगार एकजुटीचा विजय आहे. - प्रभाकर जोशी**